भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-२९/१/२०१७

# प्रेसनोट

## मोबाईल शॉपी दुकानाचे शटर लोखंडी पहारीच्या सहाय्याने तोडुन दरोडा टाकण्याच्या प्रयत्नात असलेली टोळी अटकेत

### भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दिनांक २८/१/२०१७ रोजी चे रात्री अज्ञात चोरांनी सुखसागरनगर भागात दुकानाचे शटर वाकवुन चोरी केलेली असल्याने त्या अनुषंघाने त्या भागात भारती विदयापीठ पोलीस ठाणेकडील तपास पथकातील कर्मचारी **श्रीधर पाटील व बाबा नरळे** असे दिनांक २९/१/२०१७ रोजी रात्रीची गस्त करीत असताना त्यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दोन मोटार सायकलवरुन एकुण ६ इसम हातात लोखंडी पहार घेवुन मोबाईल शॉपी दुकानाचे शटर तोडुन दरोडा टाकणार आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी सहा.पो.निरीक्षक श्री काळे सो व तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक श्री बुदगुडे यांना कळविले असता त्यांनी ताबडतोब सदरची माहीती श्री विजयसिंह गायकवाड सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळविली असता त्यांना ताबडतोब कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सदर आदेशाप्रमाणे सहा.पो.निरीक्षक श्री काळे सो व तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक श्री बुदगुडे यांनी दोन ग्रुप तयार करुन सुखसागरनगर येथील खंडोबा मंदीराजवळ हेमी स्पर्श बिल्डिंग यश मोबाईल वर्ल्ड शॉपी दुकानाजवळ सापळा लावुन रात्रौ ०२.०० वा इसम नामे १) दिपक लक्ष्मण राठोड वय.२३ वर्ष रा. स.नं १२ सुदंरनगर मांगडेवाडी कात्रज पुणे २) मोहन लक्ष्मण राठोड वय.२० वर्ष रा. सदर ३) राहुल संजय क्षिरसागर वय.१९ वर्ष रा. शंकरमंदीरजवळ फाटे आळी कात्रज गाव पुणे ४) सतिश सहदेव कदम वय.२८वर्ष रा. दिपक फर्नीचर समोर सं.नं १२ सुंदरनगर कात्रज पुणे यांना ताब्यात घेतलेले असुन त्यांचे ताब्यात एक लोखंडी पहार व दोन मोटार सायकली असा कि.रु १,१५,४५०/-रु चा माल मिळुन आलेला असुन त्यांना अटक केलेली आहे. त्यांचे दोन साथीदार अक्षय ऊर्फ आकाश चौधरी रा.येवलेवाडी व रोहीत चौधरी हे अंधाराचा फायदा घेवून पळुन गेलेले असुन पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक श्री उत्तम बुदगुडे भारती विदयापीठ पोलीस ठाणे हे करीत आहेत.

**यातील आरोपी नामे दिपक लक्ष्मण राठोड,मोहन लक्ष्मण राठोड, सतिश सहदेव कदम, अक्षय ऊर्फ आकाश चौधरी,रोहीत चौधरी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी जबरी चोरी,दरोडा,दरोड्याचा प्रयत्न,घरफोडी चोरी, तसेच गाडया जाळण्याचे गुन्हे दाखल आहेत.**

**ही कारवाई मा.पकंज डहाणे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री विजयसिंह गायकवाड सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीकांत शिंदे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक श्री.अमोल काळे तसेच तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.उत्तम बुदगुडे, पो.कर्मचारी प्रदीप गुरव,श्रीधर पाटील, विनोद भंडलकर, गणेश सुतार, समीर बागसिराज, बाबा नरळे,महादेव सोनवणे,वसंत राउत यांचे पथकाने केलेली आहे.**